रायगड पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग

टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
दुरध्वनी क्र.02141-222028/228473 फॅक्स क्र.02141-228789,
ई-मेल- sp.raigad@mahapolice.gov.in


**क्रमांकः-457/पशा-10/खाजगी ट्रॉलर्स/निविदा -2025-26,** **अलिबाग, दि. .10.2025**

**संदर्भ** :- सागरी गस्तीकरीता आवश्यक मच्छिमार ट्रॉलर्स Tender ID-2025_DGPMU_1187488_1

**विषय** :- सागरी गस्तीकरीता आवश्यक मच्छिमार ट्रॉलर्स भाडेतत्त्वांवर घेणेकरिता प्रसिध्द केलेली निविदा रदद करणे व अनामत रक्कम जप्त करणे तसेच काळया यादीत सामाविष्ठ करणेबाबत.

----------00000----------

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, सागरी सुरक्षा व सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.IGP-CS&S/All costal/Trawlwr on rent/4/2024-328 दि.09/05/2025 अन्वये सागरी सुरक्षा ही विशेष बाब म्हणून संयुक्त सागरी अभियानाच्या वेळी अथवा आकस्मित उद्भवणाऱ्या प्रसंगी खाजगी बोटी/ट्रॉलर्स भाडेतत्वावर घेण्याकरिता विहित पध्दतीने घटकस्तरावर निविदा प्रक्रिया राबवुन 04 बोटी/ट्रॉलर्स 100 (शंभर) दिवसाकरिता भाडेतत्वावर घेण्याकरीता प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापी, Tender ID:2025-DGPMU-1187488-1 ही निविदा दि.06/06/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेत **1.श्री.राकेश लक्ष्मण मर्दे, 2.श्री.प्रशांत भोय, 3.विलास वेताळे 4. श्री.संदीप चिरायु** यांनी निविदेत सहभाग घेतलेला आहे. सदर निविदेत 03 निविदाधारक कागदपत्र तपासणीत पात्र ठरले असुन 01 निविदाधारक अपात्र ठरले आहेत. त्या अनुषंगाने दि.20/06/2025 रोजी व्यापारी निविदा उघण्यात आलेली असुन त्यामध्ये 1.श्री.राकेश लक्ष्मण मर्दे यांनी-14000 (चौदा हजार) 2. श्री.प्रशांत भोय 16313 (सोळा हजार तीनशे तेरा मात्र) व 3.श्री.विलास वेताळ 16500 (सोळा हजार पाचशे मात्र) अशा दराने निविदा भरण्यात आलेल्या आहेत. श्री.राकेश लक्ष्मण मर्दे यांचे व्यापारी निविदेतील दर कमी असल्याने भाडेतत्वावर बोटी अधिग्रहीत करण्याकरिता त्यांच्याशी संपर्क करण्यात आला होता. तसेच प्रभारी अधिकारी सुरक्षा शाखा यांचे मार्फतीने श्री.राकेश लक्ष्मण मर्दे यांना कार्यालयात हजर राहणेबाबचे या कार्यालयाकडुन पत्र क्र.1 जा.क्र.457/पशा-10/खाजगी ट्रॉलर्स/2025, अलिबाग दि.04/08/2025 नुसार सोमवार दि.11/08/2025 रोजी कार्यालयात हजर राहणेबाबत बोलाविण्यात आलेले होते. त्यानुसार श्री.राकेश लक्ष्मण मर्दे हे या कार्यालयात दि.11/08/2025 रोजी उपस्थित राहिले होते. परंतु अपर पोलीस अधीक्षक यांची भेट होवू शकली नाही. श्री.राकेश लक्ष्मण मर्दे हे दोन दिवसांनी परत भेटीकरिता येतो असे कार्यालय अधिक्षक यांना समक्ष भेटुन सांगीतले होते.

परंतु श्री.राकेश लक्ष्मण मर्दे हे परत भेटीस न आल्याने त्यांना वारंवार भ्रमणध्वनीव्दारे व मेसेजव्दारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न दिल्याने त्यांना पुन्हा जा.क्र.457/पशा-10/खाजगी ट्रॉलर्स/2025. अलिबाग दि.28/08/2025 नुसार पत्र पाठविण्यात आलेले होते. तदनंतर पुनश्चः दि.01/09/2025 रोजी कार्यालयात हजर राहणेबाबतचे प्रभारी अधिकारी सुरक्षा शाखेमार्फत पाठविण्यात आले. परंतु ते समक्ष भेटण्यास आले नाहीत, तसेच कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार त्यांनी केला नाही. यास्तव पुन्हा संदर्भ क्र.3 पोअरा/457/पशा-10/खाजगी ट्रॉलर्स/2025, अलिबाग दि.12/09/2025 नुसार दि.15/09/2025 रोजी उपस्थित राहणेबाबत तिसरे पत्र पाठविण्यात आले.

त्या अनुषंगाने सहा.पोलीस निरीक्षक सुरक्षा शाखा यांचेकडिल सुरक्षा शाखा/खाजगी ट्रॉलर्स/2025/दि.22/09/2025 अन्वये, दि.15/09/2025 रोजी उपस्थित श्री.राकेश लक्ष्मण मर्दे समक्ष भेटण्यास आले नाहीत, तसेच फोनव्दारे, व्हॉटसअप मेसेजव्दारे कोणतेही संभाषण झालेले नाही .त्याबाबत नियंत्रण कक्ष रायगड येथे दि.15/9/2025 रोजी रोजनामा नं.258/2025 नोंद क्र.15 अन्वये 12.10 वाजता नोंद घेण्यात आली आहे. तसेच दि.22/09/2025 रोजी नोंद क्र. नं. 17 वेळ 18:00 वा. रोजनामा क्र. 265/2025 रोजी नोंद घेण्यात आली. दि.15/09/2025 रोजी पासुन ते आजपर्यंत फोन लावुन सुध्दा श्री.राकेश लक्ष्मण मर्दे हे फोन उचलत नाही तसेच या कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही. निविदाधारक यांचे या वागणूकीमुळे रायगड जिल्हा पोलीस दलाचा नाहक वेळ व कालावंधी वाया गेलेला आहे. सदरच्या ई-निवेदेत श्री. मर्दे यांनी कार्यालयाने दिलेल्या नियोजित वेळी बोलाविले असता उपस्थित राहिले नाहीत तसेच बोटी तांत्रिक तपासणीकरिता उपलब्ध करण्यास असमर्थता दाखविलेली आहे. पोलीस अधिक्षक, रायगड यांच्या अधिपत्याखाली येणारा समुद्रकिनारा हा अतिसंवेदनशील असल्याने सागरी सुरक्षेच्या दृष्टीने बोटी वेळेत गस्तीकरिता अधिग्रहीत करणे ही फार महत्वाची बाब आहे. तरी अशा संवेदनशील परिस्थितीत समुद्र किनारा सुरक्षिततेसाठी एक प्रभावी माध्यम म्हणुन बोटी वेळेत गस्तीकरिता अधिग्रहित करणे ही बाब होती. तरी श्री.राकेश लक्ष्मण मर्दे यांचे वर्तन हे बेजबाबदारपणाचे व निष्काळजीपणाचे असल्याने श्री.राकेश लक्ष्मण मर्दे यांना या निविदा प्रक्रीयेतुन **अपात्र घोषीत** करण्यात येत आहे.

श्री. राकेश लक्ष्मण मर्दे या कार्यालयाकडुन जाहिर करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतुन अपात्र म्हणुन घोषित करण्यात आलेले असल्याने शासन निर्णय उदयोग,उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-2014 प्र.क्र.82 भाग -3/उद्योग-4 दिनांक 1/12/2016 नियमानुसार अ.क्र 4.6-ई अन्वये त्यांनी या कामाची निविदा भरतेवेळी शासनास जमा केलेली अनामत (EMD) रक्कम र.80,000/-(अक्षरी रुपये ऐंशी हजार मात्र) रायगड जिल्हा पोलीस दलाचे 1301000362 या आहरण व संवितरण (DDO) खाती -11236850845 IFSC CODE SBIN 000308 जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्यांना शासन निर्णय उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-2014 प्र.क्र.82 भाग -3/उद्योग-4 दिनांक 1/12/2016 नियमानुसार अ.क्र 5.2- अ मधील नमुद प्रमाणे एखादया संस्थेच्या व्यवसायासंबधीच्या व्यवहारावर बंदी घालण्याचे दोन प्रकार असतील त्यातील **अ-एका विभागाकडुन आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांकडुन बंदी घालणे याप्रमाणे काळया यादीत (Black list) करण्यात येत आहे** .

तसेच निविदाधारक श्री.प्रशांत भोय व विलास वेताळ यांना मा.पोलीस अधीक्षक यांचे समक्ष विचारणा केले असता L-1 च्या दराने बोट भाडेतत्वावर देण्यास असमर्थता दर्शविलेली असल्याने सदरची निविदा **रदद** करण्यात येत आहे.

(आँचल दलाल)
**पोलीस अधीक्षक रायगड**

प्रति,

1) प्रभारी अधिकारी, सुरक्षा शाखा
2) प्रभारी अधिकारी, नौका विभाग
3) प्रभारी अधिकारी, बिनतारी संदेश विभाग
4) प्रभारी अधिकारी, मोटार परिवहन विभाग)

**प्रत माहीतीस्तव** :- प्रमुख लिपीक, लेखा शाखा.

2/- वर नमुद प्रमाणे ई-निविदाधारक श्री.राकेश लक्ष्मण मर्दे अनामत रक्कम या घटकाचे. डी.डी.ओ खाती जमा झाल्याची खात्री करुन त्याबाबत या कार्यासनास अवगत करण्यात यावे.